आरबीआय / २००५-०६/ १३५
डीबीओडी. क्र. एएमएल. बीसी. २८/१४.०१.००१ / २००५-०६

ऑगस्ट २३, २००५

प्रति
प्रिय महोदय,

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(आरआरबी सोडून)

प्रिय महोदय,

**<u>केवायसी मार्गदर्शक तत्वे काळा पैसा पांढरा करणे रोखण्याची मानके</u>**

आमच्या उपरोल्लेखित विषयावरील निर्देश क्र. डीबीओडी. क्र. एएमएल. बीसी. ५८/१४.०१.००१ /२००४-०५ दिनांक नोव्हेंबर २९, २००४ चा संदर्भ घ्यावा. वरील परिपत्रकान्वये, बँकांना ग्राहक स्वीकार तत्वे व ग्राहक ओळख पद्धती, खाते उघडतांना पाळण्यासाठी निर्माण करावयाची होती. बँकांनी ग्राहकांचे वर्गीकरण कमी, मध्यम व उच्च जोखीम असलेल्या ग्राहकां मधे करायचे होते. मार्गदर्शक तत्वांनुसार बँकांनी ग्राहकांची ओळख व पत्ता हेही परिपत्रकाच्या परिशिष्ट २ मधील कागदपत्रांच्या आधारे पडताळून घ्यायचे होते.

२) वरील परिपत्रकात ओळख व पत्त्यासाठी लागणारी वेगवेगळी कागदपत्रे घेण्याची सोय व लवचिकता ठेवली असूनही आम्हाला असे समजते की निम्न उत्पन्न गटातील बऱ्याच व्यक्तींना, शहरी व ग्रामीण विभागात - ही कागदपत्रे बँकेस देता येत नाहीत. यामुळे ते बँकेन खाते उघडण्यास असमर्थ ठरतात व बाजूला पडतात. त्यामुळे आता, ज्या व्यक्तींना रु. ५०,००० च्या वर (सर्व खात्यात मिळून) शिल्लक ठेवायची नाही आणि ज्यांच्या सर्व खात्यांवर मिळून होणारी जमा रु. १००००० (रु. एक लाख) पर्यंतच होईल, अशा व्यक्तींसाठी केवायसी च्या अटी आणखी सोप्या करायचे ठरले आहे.

३) जर खाते उघडणारी व्यक्ती, वरील परिपत्रकाच्या परिशिष्ट २ प्रमाणे कागदपत्र देऊ शकत नसेल तर बँकांनी अशी खाती परिच्छेद २ प्रमाणे उघडावीत यासाठी आवश्यक :

अ) केवायसी प्रमाणे खाते उघडलेल्या एका खातेदाराची ओळख. मात्र असे खाते, किमान सहा महिने समाधानकारक रीत्या चालवलेले असावे. नवीन खातेदाराचा फोटो व पत्ता ओळखदाराने प्रमाणित केला पाहिजे.

**किंवा**

ब) बँकेचे समाधान होईल असा, ओळख व पत्त्याचा पुरावा.

४) असे खाते उघडतांना, खातेदारास विदित करावयाचे आहे की, कुठल्याही वेळी जर त्याच्या खात्यांतील शिल्लक रु. ५०,००० च्यावर किंवा एकूण जमा रक्कम रु. १,००,०००च्या वर गेल्यास, त्या खात्यावरील व्यवहार केवायसी प्रमाणे पूर्ण ओळख देईपर्यंत बंद ठेवले जातील. खातेदाराची

गैरसोय टाळण्यासाठी बँकेने शिल्लक रु. ४०,०००/- व जमा रक्कम रु. ८०,००० पर्यंत पोचल्यावर केवायसी साठी लागणारे कागदपत्र देण्याची सूचन दिली पाहिजे व असेही कळवले पाहिजे की एका वर्षात एकूण शिल्लक रु. ५०,००० वा एकूण जमा रु. १,००,००० झाल्यास माहिती मिळेपर्यंत व्यवहार थांबवले जातील.

५) परिपत्रक क्र. डीबीओडी. क्र. एएमएल. बीसी. २३/१४.०१.०६४ / २००५-०६ दि. ऑगस्ट २, २००५ च्या अटीं प्रमाणे, बँकांना पूरग्रस्तांसाठी केवायसी शिथिल कडून खाती उघडण्यास सांगितले होते, म्हणजे त्यांना सरकारची मदत मिळू शकेल. अशी खातीही वरील खात्यांप्रमाणेच धरली जातील परंतु अशा खात्यांवरील कमाल रक्कम म्हणजे मिळालेली मदत रु. ५०,००० यां पैकी जास्त असलेली रक्कम व मिळालेली मदत, ही वर्षातील जमा रकमांमधे धरली जाणार नाही.

६) या निर्देशाच्या त्वरित पालनासाठी बँकांनी शाखांना आदेश द्यावेत.

आपला विश्वासू

प्रशांत सरन

मुख्य महाव्यवस्थापक